# समकालीन मानवी हक्क




संपादक

**डॉ. रिता एम. धांडेकर**

# समकालीन मानवी हक्क

■ डॉ. रिता एम. धांडेकर

■ प्रथम आवृत्ती – १० डिसेंबर २०२१

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 200/-

ISBN-978-93-91305-56-7

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख / लेखक | पु.क्र. |
|---|---|---|
| 1 | महिला सुरक्षा एवं महिला अधिकार<br>**डॉ.(श्रीमती) शक्ति जैन** | 1 |
| 2 | भारत में मानवाधिकार की स्थिती<br>**डॉ. किशोर बी. वासनिक** | 15 |
| 3 | भारतीय लोकतंत्र में मौलिक अधिकारों का महत्व<br>**डॉ. कृष्णा सोलंकी** | 23 |
| 4 | महात्मा गांधी व मानवाधिकार **डॉ. डी.एन.प्रसाद** | 27 |
| 5 | महीलाओं के कानुनी अधिकार<br>**प्रा.कविता आर. किर्दक** | 33 |
| 6 | महिलांची सुरक्षा व मानवाधिकार **डॉ.मीनाक्षी कुबडे** | 38 |
| 7 | भारतीय संविधान आणि मानवी अधिकार : एक चिकित्सक अध्ययन **डॉ.सुभाष दौलतराव उपाते** | 45 |
| 8 | भारतीय स्त्रीवर्गाचे हक्क व मानवाधिकार<br>**प्रा.डॉ. एन. आर. वर्मा** | 56 |
| 9 | मानवी हक्क आणि सामाजिक न्याय :एक समाजशास्त्रीय मुल्यमापन **प्रा.डॉ.नाजूकराम बनकर** | 63 |
| 10 | स्त्रीवाद आणि सामाजिक समानता<br>**प्रा.डॉ.सौ. मंगल एकनाथ डोंगरे** | 68 |
| 11 | आदिवासी समाज आणि मनाव अधिकार<br>**डॉ. रमेश बलभीम जाधवर** | 75 |
| 12 | मानवी हक्क : न्यायालयीन प्रक्रिया एक चिंतन<br>**प्रा.डॉ. राठोड एस.जी.** | 83 |
| 13 | भारतीय राज्यघटना व मानवाधिकार<br>**प्रा.डॉ. संजय एम. अवधुत** | 87 |

| | | |
|---|---|---|
| 14 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार<br>**प्रा.डॉ.दिनकर संतुकराव कळंबे** | 97 |
| 15 | अन्नसुरक्षा मानवाचा एक मुलभूत अधिकार :<br>भारताची सध्यास्थिती आणि उपाययोजना<br>**डॉ.आशालता सोनवणे** | 106 |
| 16 | नागरी स्थानिक प्रशासन आणि महिला आरक्षण<br>**डॉ. भालेराव जे.के.** | 113 |
| 17 | आदिवासी समुदाय आणी मानवी हक्क<br>**डॉ.हेमंत केशवराव बारसागडे** | 121 |
| 18 | भारतीय स्त्री व मानव अधिकार **डॉ. निलिमा. वाय. भोगे** | 131 |
| 9 | मानवाधिकार आणि भारतातील दहशतवाद<br>**डॉ. संजय गोपाळराव ठवळे** | 137 |
| 0 | मानवी हक्कांच्या संदर्भात समाज कल्याण<br>विभागाचे महत्त्व **गीतांजली शंकरराव चव्हाण** | 145 |

# भारतीय स्त्री व मानव अधिकार

डॉ. निलिमा. वाय. भोगे
सहयोगी प्राध्यापक कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,चिखलदरा.

मानवी समाजाचा विकास होत असतांना समाजातील सर्व घटकांचा, प्राणीमात्राचा, स्त्री पुरुषांचा समान विकास व्हावयास पाहिजे. सर्वांना समान संधी प्राप्त होण्याकरिता समान अधिकार मिळायला पाहिजे तेव्हाच समाजामध्ये स्थिरता निर्माण होऊन सर्व मानव जातीतील सदस्य सुखमय व आनंदमय जीवन जगू लागतील.

कार्ल मार्क्सने इतिहासाचे पाच कालखंड सांगतांना अगदी सुरुवातीच्या कालखंडामध्ये म्हणजे आदिम साम्यवादी कालखंडामध्ये कोणी कोणाचे शोषण करीत नव्हते. शोषण विरहीत समाजव्यवस्था अस्तीत्वात होती परंतु नंतरच्या प्रत्येक कालखंडामध्ये वर्गरहीत समाजव्यवस्था निर्माण होऊन एक वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करीत त्यामुळे समाजव्यवस्थेचा संतुलीत विकास होत नव्हता व सर्व मानवजाती आनंदमय जीवन व्यतीत करीत नव्हत्या.

समाजातील प्रत्येक मानवाला त्याच्या विकासाच्या दृष्टीने अधिकार प्राप्त व्हावे. समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीला सन्मानपुर्वक वागणूक मिळायला पाहिजे या दृष्टीकोनातून मानव अधिकार नावाची संकल्पना पुढे आली.

मानव अधिकाराची संकल्पना लिखीत स्वरुपामध्ये इंग्लंडच्या मैग्ना कार्टा (Magna Carta) सोबत सुरु झाली होती 1688 मध्ये संयुक्त राष्ट्राच्या स्वातंत्र्याची घोषणा 1776, अधिकार विधेयक 1791 तसेच फ्रेंच मानवीय अधिकारासोबत सुरु झाली.

जगातील पहिल्या महायुध्दानंतर 1929 मध्ये आंतरराष्ट्रीय न्याय संस्थेने एक आंतरराष्ट्रीय घोषणापत्र जाहीर केले त्यामध्ये अनेक देशाच्या संविधानामध्ये या संदर्भातील काही तरतुदी करण्यात आल्या. (फ्रान्स, अमेरिका) तसेच वैश्वीक मानवता निर्माण करण्याकरिता लागू केल्या. घोषणापत्र एक मध्ये प्रत्येक राज्याचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे व संपत्तीचे अधिकार सिमित ठेवून या अधिकराला आपल्या मर्यादेच्या बाहेरही राष्ट्रीयता, लिंग, भाषा व धर्म यांच्या भेदभावापासून त्याचे संरक्षण करायला पाहिजे.

मानवाच्या मुलभूत अधिकाराचे महत्व दुसऱ्या महायुध्दानंतर वाढले. 01 जानेवारी 1942 च्या संयुक्त राष्ट्र संघाने आपल्या घोषणापत्रामध्ये यावर विशेष भर दिला की, जीवन, संपत्ती व धार्मिक स्वातंत्र्याची सुरक्षितता महत्वपुर्ण आहे. संयुक्त राष्ट्र, ब्रिटन व सोवियत संघाच्या 03 मार्च 1943 फिलाडेल्फीयाच्या आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या

घोषणापत्रामध्ये जाहीर केले की, "सर्व मानवानी धर्म, लिंग, वंश इत्यादी भेदभावांना दूर ठेवून मनुष्याला आपल्या भौतिक व आध्यात्मिक विकासाकरिता स्वातंत्रता व आर्थिक स्वातंत्रेचे समान अधिकार आवश्यक आहे".

1944 च्या डरबन सम्मेलनामध्ये चार महाशक्तीने एक नविन विश्वसंघटनाचे प्रारुप तयार केले. 1945 च्या अटलांटा सम्मेलनामध्ये स्वतंत्र्य युरोपाच्या सिध्दांताचा स्वीकार केला. संयुक्त राष्ट्राच्या 25 एप्रिल 1945 च्या घोषणापत्राला सानफ्रान्सीसको सम्मेलनामध्ये स्वीकार केले. 10 डिसेंबर 1948 ला संयुक्त राष्ट्रसंघाच्या सामान्य सभेमध्ये मानव अधिकाराचे एक सार्वभौमिक घोषणापत्र तयार केले. ज्यामध्ये समस्त मानव जातीकरिता प्रत्येक राष्ट्र व समाजाचे हे दायित्व आहे की, लोकांना अधिकाराविषयी शिक्षित करुन मानव अधिकाराच्या विकासाकरिता कार्य करावे. 1966 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या सामान्य सभेमध्ये मानव अधिकाराच्या मार्गदर्शनाकरिता दोन विधाने पास करण्यात आले.

1. नागरिक व राजकीय अधिकार
2. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार

**मानवअधिकाराची व्याख्या :**

- "संपूर्ण व्यक्तीविकास साध्य करण्याच्या दृष्टीने समता, स्वातंत्र, बंधूता व न्याय या लोकशाही मुल्यांना आधारभूत मानून संपूर्ण सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणणारी विचारधारा म्हणजे मानवाधिकार होय."
- "संपूर्ण मानवतावादी विषमतारहीत विकासमुलक न्यायपुर्ण व स्वातंत्र्यपुर्ण विचारधारा म्हणजे मानवाधिकार होय."

मानवाधिकार संकल्पना संपूर्ण मानवी समाजाला पोषक असून सर्वांचा विकास समताधिष्ठीत विचारप्रणालीच्या मार्गानेच व्हावयास पाहिजे असे अभिप्रेत आहे.

मानवाधिकाराचा भारतीय राज्यघटनेवर मोठा प्रभाव असून संविधान निर्माणकर्त्याने अनेक अधिकार हे मुलभूत अधिकाराच्या कक्षेमध्ये समाविष्ट केले आहे.

1. समतेचा अधिकार कलम 14 ते 18
2. स्वातंत्र्याचा अधिकार कलम 19 ते 22
3. शोषणाविरुध्दचा अधिकार कलम 23 ते 24
4. धर्म स्वातंत्र्याचा अधिकार कलम 25 ते 28
5. शिक्षणाचा अधिकार कलम 30
6. संपत्तीचा अधिकार कलम 31

44 वा संशोधन अधिनियम 1978 कलम 7 द्वारा (20.06.1979)

मानवाधिकार हा कोणत्याही एका व्यक्तीला, समुहाला किंवा राष्ट्राला दिलेला अधिकार नाही तर तो सर्व मानव कल्याणार्थ निर्माण करण्यात आलेली अधिकाराची संहिता आहे आम्ही सर्व मानव आहो आणि सर्वांना मानवाचे सर्व अधिकार मिळायला पाहिजे हा प्रत्येक मानवाचा हक्क आहे.

**भारतीय समाजातील स्त्री :**

भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती ही दुय्यम स्वरुपाची आहे. अगदी सुरुवातीच्या ऋग्वेद काळाचा अपवाद सोडल्यास प्रत्येक कालखंडामध्ये स्त्रियांच्या वाटयाला कनिष्ठतवच आले आहे. तिचे अधिकार नाकारुन तिला परावलंबी बनवले गेले. पुरुषप्रधान संस्कृतीने तिच्यावर धार्मिक, आर्थिक, वैवाहीक, सामाजिक, सांस्कृतिक बंधने लादून तिचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. तिला परावलंबी बनविले. जन्मापासून तर मृत्यू अवस्थेपर्यंत वेगवेगळया नात्याच्या पुरुषांवर ती अवलंबुन होती. तिला विचार करण्याचे स्वातंत्र्य नव्हते तिला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते. दैव, दानव संस्कृतीमध्ये ती गुरफटत गेली. मानवनिर्मित दुःख ईश्वरनिर्मित मानल्या जाऊ लागले त्यामुळे स्त्रिला आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची योग्य कारणमिमांसा करता आली नाही. गुलामीच्या अनेक बेडयांना ती स्वतःची आभूषणे म्हणून मिरवत गेली.

आपल्या देशामध्ये स्त्रियांवर जे अन्याय अत्याचार होतात त्याला पारंपारिक रुढी, प्रथा, परंपरा, धार्मिक संकल्पना यांचे पाठबळ आहे. म्हणूनच दिर्घ अवधीपर्यंत एखाद्या समुदायावर अन्याय करणे सोपे झाले.

महिलांच्या विकासाकरिता या देशामध्ये अनेक कायदे आहेत. उदा. हुंडाबंदी कायदा, बालविवाह बंदी कायदा, शिक्षणविषयक हक्क, मालमत्ताविषयक हक्क, घटस्फोटाविषयक हक्क इत्यादी परंतु ते कायदे आपणास कागदावर दिसतात अपवाद वगळता अनेक ठिकाणी पुरुषी मानसीकता न बदलल्यामुळे वाद-विवाद घडून येतांना दिसतात व शेवटी एक स्त्री म्हणून ती माघार घेऊन पुरुषी मानसीकतेला बळी पडल्याचे अनेक उदाहरणे आपणास पहावयास मिळतात.

माओच्या मतानुसार "संस्काराचा पगडा दुर करणे अतिशय अवघड असते. त्याकरिता आटोकाट प्रयत्न सातत्याने करावे लागतात. ते प्रयत्न न करता केवळ कायदे करुन समाजमन बदलत नाही. कायद्याची अंमलबजावणी करणारे आणि कायद्याचा अन्वयार्थ लावणारेही याच समाजातून येतात हे आपण विसरता कामा नये."

अंमलबजावणीची सर्व जबाबदारी दंडयंत्रणा, न्याय यंत्रणा, नौकरशाही आणि शासनयंत्रणेची आहे असे मानून आपण व्यवहार करायला लागलो तर कोणताही प्रश्न सुटणार नाही. कारण या यंत्रणा ज्याच्यासाठी राबवायच्या आणि नविन समाज घडवायचा तो समाज म्हणजे आपणच आहोत त्याकरिता आपणा सर्वांना सक्षम होणे गरजेचे आहे.

महिला समाजाचे एक अविभाज्य अंग आहे. अनेक संकल्पनेच्या, नात्याच्या माध्यमातून तिला सर्वोच्च स्थानी बसविले आहे तिला सुख, समृध्दीचे प्रतिक मानल्या गेले. शारदा, सरस्वती, लक्ष्मी अशा सन्मानाच्या पदव्या बहाल करण्यात आल्या परंतु व्यवहारात मात्र तिच्यावर सातत्याने अन्याय करण्यात आले आहे व वर्तमान परिस्थितीमध्ये देखील तिच्यावर मोठया प्रमाणात अन्याय होत आहे तिला मिळालेले मानवाधिकार हे फक्त पुस्तकात आहे हे आपणास खालील आकडेवारीवरुन अधिक स्पष्ट होईल.

**2003 मध्ये भारतातील महिलांवरील हिंसेच्या नोंदणीकृत घटना :**

छळ (३०.४%) विनयभंग (२५%) , अपहरण (१२%), बलात्कार (१२.८%), भृणहत्या (६.७%), लैंगिक अत्याचार (४.६०%), हुंडामृत्यू (४.६%), हुंडा निषेध (२.३%) व अन्य (०.६%).

वरील सर्व घटनांचा विचार केल्यास आपल्या असे निदर्शनास येते की, मानव अधिकार हा लिंग व मानसिकतेशी संबंधीत आहे त्यामुळेच प्रत्येक दिवसाला वरील घटनांचे प्रमाण हे वाढतच आहे. महिलांकडे बघण्याचा पुरुषी दृष्टीकोनामध्ये फारसा बदल झालेला दिसून येत नाही. समाजामध्ये नैतिकतेचा अभाव आढळून येतो. सामाजिक मुल्ये कमकुवत पडत आहेत. व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढत आहे. म्हणूनच हिंसेचे प्रमाण वाढत आहे.

**भारतातील प्रत्येक राज्यामध्ये सन 2001–2002 मध्ये घडलेल्या घटना :**

| अ. क्र. | केंद्रशासीत राज्य | बलात्काराची संख्या | |
|---|---|---|---|
| | | वर्ष 2001 | वर्ष 2002 |
| 1 | दिल्ली | 381 | 233 |
| 2 | अंदमान | 03 | 02 |
| 3 | चंदिगड | 18 | 18 |
| 4 | पांडेचरी | 09 | 06 |
| 5 | लक्षद्वीप | 00 | 01 |
| 6 | दमनद्वीव | 00 | 00 |

| अ. क्र. | राज्यशासीत राज्य | बलात्काराची संख्या | |
|---|---|---|---|
| | | वर्ष 2001 | वर्ष 2002 |
| 1 | बिहार | 888 | 835 |
| 2 | छत्तिसगड | 959 | 966 |
| 3 | गुजरात | 286 | 245 |
| 4 | हरियाणा | 398 | 311 |
| 5 | झारखंड | 561 | 633 |
| 6 | केरळ | 562 | 986 |
| 7 | मध्यप्रदेश | 2851 | 2256 |
| 8 | महाराष्ट्र | 1302 | 1277 |
| 9 | ओरिसा | 790 | 634 |
| 10 | राजस्थान | 1049 | 1051 |
| 11 | तामिळनाडू | 423 | 509 |
| 12 | उत्तरप्रदेश | 1958 | 1366 |
| 13 | उत्तरांचल | 74 | 63 |
| 14 | पश्चिम बंगाल | 709 | 759 |
| एकूण | | 12810 | 11891 |

वरील सर्व आकडेवारीवरुन आपल्या असे निदर्शनास येते की, भारतीय महिलांवर होत असलेल्या बलात्काराला अनेक कारणे असली तरी महत्वपुर्ण कारण म्हणजे पुरुषी मानसिकता व पुरुषसत्ताक पध्दती आहे. अनेक अश्लील साहित्य, अल्कोहोल ही पुरुषी मानसिकतेला पोषक ठरत आहे.

वरील समस्येच्या समाधानाकरिता समाजामध्ये जाणीव जागृती निर्माण करणे, कठोर शिक्षेची तरतूद करणे. सामाजिक व नैतिकता शिक्षणाचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करणे, नशायुक्त पदार्थ व अश्लील चित्रपट, चित्रफिती यावर बंदी घालणे इत्यादी.

**संदर्भ सूची**

दुबे मधु मंजरी — 'मानव अधिकार', राज पब्लिशिंग हाऊस, 44, परनामी मंन्दिर, गोविंद मार्ग, जयपूर 302004

कौशिक आशा — 'नारी सशक्तीकरण', पोईन्टर पब्लिशर्स, व्यास बिल्डींग, एम. एम. एस. हाईवे जयपूर 3020003

नाराणी नारायण प्रकाश — 'मानवाधिकार एवं महिलाएँ', सबलाइम पब्लिकेशन्स, 18 जैन भवन, एम. बी. सी. के. सामने शांती नगर जयपूर 3020006

राय अरुण — 'जनहित याचिका और मानव अधिकार', राधा पब्लिकेशन्स 4378/4B अंबारी रोड दरियागंज नई दिल्ली 110002

सिन्हा मृदुला अध्यक्ष — 'समाज कल्याण' (मासिक) समाज कल्याण भवन बी–12 कुतुब इस्टिटयूशनल एरिया नई दिल्ली 110016
अगस्ट 2004, सितम्बर 2004, दिसम्बर 2004

Khobragde Digambar
Chif editor — Research Journal of Education Humanities & Social Science c/o Prof. Bhagwan Nannawarg 4, Jaibhim Housing Society Chandramani Nagar Nagpur 440027

Kohli A. S. — Human Right and Social Work, Kanishka Publishers, Distributors New Delhi

Stephen Rev. M. — Human Rights Concept and Perspectives, Concept Publishing company A/15-16, Commercial Block, Mohan Gardan New Delhi 110059 (India




## डॉ. रिता एम. धांडेकर

एम. ए., बी. एड., सेट, नेट, पीएच. डी. (राज्यशास्त्र)

सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर.


- पदवी स्तरावर - १८ वर्षे अध्यापन कार्याचा अनुभव.
- पदव्युत्तर स्तरावर - २ वर्षे अध्यापन कार्याचा अनुभव.
- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये एकूण ४० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित.
- राष्ट्रीय, राज्यस्तरीय चर्चासत्रे, परिषदांमध्ये ५० पेक्षा जास्त शोधनिबंधाचे सादरीकरण.
- अनेक ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्रे, परिषदांमध्ये सहभाग.
- संघटन सचिव - विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा पुरस्कृत मानवी हक्क व मूल्यशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम.
- संघटन सचिव - विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा पुरस्कृत सात दिवसीय मानवी हक्क जागरुकता कार्यशाळा.
- संयोजक - विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा पुरस्कृत तीन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन तारुण्यभान जीवन शिक्षण कार्यशाळा.
- 'भाषा व सामाजिक शास्त्राचे महत्त्व' आणि 'लिंगभाव समानता' या विषयावरील राष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन.
- महिला हक्क, लिंगभाव समानता तथा अन्य सामाजिक व राजकीय विषयावर व्याख्याने सादर.
- सहसचिव - राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद,नागपूर (विदर्भ प्रांत) २०१७ ते २०२२.
- कार्यकारिणी सदस्य - महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद (२०१९ ते २०२२). आजीव सदस्य - महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद.
- कार्यकारिणी सदस्य - इंडियन रिसर्च ॲंड एज्युकेशनल फाऊंडेशन, वर्धा.


**Aadhar Publications**

New Hanuman Nagar, Infront of Pathyapustak Mandal, VMV Road, Amravati - 444604

Email - aadharpublication@gmail.com, M.: 9595560278

ISBN:978-93-91305-56-7